


जनमानसाचा निडर आवाज...

# पुणे प्राईम न्यूज

मुख्य संपादक : जनार्दन दांडगे




दैनिक | वर्ष १ | अंक २५५ | मंगळवार, १४ एप्रिल २०२६ | मूल्य : २ रु. | पाने : ४ | RNI NO - MAHMAR/2022/84210


# हवेली 'सभापती'चा पानंद व शेतरस्त्याचा पॅटर्न महसूल विभाग राज्यभर राबविणार

## महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांची लोणीकंद येथे घोषणा

## मोजणीची सर्व प्रकरणे अवघ्या १५ दिवसांत निकाली काढण्याचे आदेश

**संदीप बोडके**

लोणी काळभोर, ता. १३ : शेतकऱ्यांच्या रस्त्यांच्या समस्या सोडवण्यासाठी हवेली तालुक्यात एक महत्त्वपूर्ण आणि दूरदृष्टीचा निर्णय घेण्यात आला आहे. हवेलीचे सभापती युवराज काकडे यांनी मुख्यमंत्री बळीराजा पाणंद व शेत रस्ता योजनेअंतर्गत पाणंद व शेतरस्त्यांसाठी ग्रामपंचायतींना ग्रामसभा घेणे अनिवार्य केले आहे. या निर्णयामुळे शेतरस्ते आणि पाणंद मार्गांच्या कामांना मोठा वेग मिळणार आहे. बळीराजासाठी हा ऐतिहासिक निर्णय असून, काकडे यांनी मांडलेली ही संकल्पना महसूल विभाग राज्यभर राबविणार आहे. असे सूतोवाच राज्याचे महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी केले आहे.

लोणीकंद (ता. हवेली) येथे छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियान समाधान शिबिराचे आयोजन सोमवारी (ता. १३) करण्यात आले होते. यावेळी महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी वरील सूतोवाच केले. कार्यक्रमाला विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार, अपर जिल्हाधिकारी सतीश राऊत, उपविभागीय अधिकारी यशवंत माने, अपर तहसीलदार तृप्ती कोलते पाटील, पुणे जिल्हा मध्यवर्ती बँकेचे संचालक प्रदीप कंद, हवेली पंचायत समितीचे सभापती युवराज काकडे, जिल्हा परिषदेचे सदस्य किरण साकोरे यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. पुढे बोलताना चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले, महाराजस्व शिबिराच्या माध्यमातून राज्यात पहिल्या टप्प्यात




४० हजार फेरफार दुरुस्ती, २० हजार सातबारा दुरुस्ती, १ लाख ५० हजार संगणकीकृत सातबाऱ्यांचे वाटप, ७५ हजार ८अ नोंदींचे वाटप, १ लाख ७५ हजार विविध प्रकारच्या प्रमाणपत्रांचे वितरण, ३४ हजार एक खिडकी योजनेअंतर्गत प्रमाणपत्रांचे वाटप, २ हजार कमी-जास्त पत्रके तयार करणे आणि ५०० गावांतील दस्तावेज दुरुस्ती करण्यात आली आहे. पुणे जिल्ह्यात १३ हजार ३३ दाखल्यांचे वितरण करण्यात आले असून, एकूण सुमारे ५ लाख कुटुंबांना या शिबिराचा लाभ मिळाला आहे. छत्रपती शिवाजी महाराजांच्या नावाला साजेसं काम राज्य शासनाकडून गेल्या दोन महिन्यांत करण्यात आले आहे, असे त्यांनी नमूद केले.

हवेली पंचायत समितीचे सभापती युवराज काकडे यांनी पुढाकार घेऊन केलेला हा निर्णय शेतकऱ्यांसाठी दिलासा देणारा ठरत आहे. अनेक गावांमध्ये शेतरस्त्यांच्या अभावामुळे होणारा त्रास, मालवाहतुकीतील अडचणी आणि पाणंद रस्त्यांवरील वाद यावर आता ग्रामसभेच्या माध्यमातून थेट तोडगा निघणार आहे. या अभिनव निर्णयाचे महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनीही कौतुक केले.


दरम्यान, हवेली तालुक्यातील तब्बल १६०० मोजणी प्रकरणे प्रलंबित असल्याचा धक्कादायक आकडा समोर आला आहे. यामुळे नागरिकांमध्ये नाराजी असून, जमिनीच्या मोजणीअभावी अनेक व्यवहार रखडले आहेत. ही सर्व प्रकरणे अवघ्या १५ दिवसांत निकाली काढण्याचे आदेश देत लोकाभिमुख सरकार उभे करायचे असेल तर नागरिकांची कामे वेळेत पूर्ण झाली पाहिजेत, असे स्पष्ट निर्देश बावनकुळे यांनी दिले आहेत.

पुढे बोलताना प्रदीप कंद म्हणाले, हवेली तालुक्यात मुख्यमंत्री बळीराजा पाणंद रस्ते योजनेची कामे प्रगतीपथावर आहेत. ही योजना यशस्वी करण्यासाठी लोकप्रतिनिधी आणि प्रशासन मिळून जोमाने काम करत आहेत. महसूल विभागाकडून देण्यात येणाऱ्या सेवांबाबत समाधान व्यक्त करत, येत्या काळात तालुक्यातील नागरिकांच्या अडचणी सोडवण्याचा प्रयत्न केला जाणार आहे.

### हवेलीतील शेतरस्ते व पाणंद रस्ते मोकळे होणार?

हवेली तालुक्यातील अनेक गावांमध्ये पाणंद रस्ते, शिवरस्ते आणि शेतरस्ते अतिक्रमणाच्या विळख्यात अडकले आहेत. यामुळे शेतकऱ्यांमध्ये सतत वाद निर्माण होत आहेत. हे वाद कायमचे मिटवण्यासाठी रस्ते मोकळे करणे गरजेचे आहे. आतापर्यंत महसूल विभागाचे प्रयत्न अपुरे पडत होते. मात्र, आता ग्रामपंचायतींचा सक्रिय सहभाग मिळणार असल्याने शेतरस्ते आणि पाणंद मार्ग लवकरच खुले होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

## संक्षिप्त



### डगआउटमध्ये मोबाईल वापरणाऱ्या मॅनेजरवर होणार कारवाई

**मुंबई, ता. १३ :** आरसीबी विरुद्धच्या सामन्यादरम्यान राजस्थान रॉयल्सचे टीम मॅनेजर रोमी भिंडर डगआउटमध्ये मोबाईल फोन वापरताना कॅमेऱ्यात कैद झालेत. बीसीसीआयच्या पीएमओए प्रोटोकॉलनुसार, थेट सामन्यादरम्यान डगआउटमध्ये मोबाईल वापरण्यास सक्त मनाई आहे. बीसीसीआयच्या अधिकाऱ्यांनी या नियमांच्या उल्लंघनाची पुष्टी केली असून भ्रष्टाचार विरोधी युनिट या प्रकरणाचा तपास करत आहे. या चुकीसाठी भिंडर यांना ताकीद दिली जाऊ शकते किंवा काही सामन्यांची बंदी देखील घातली जाऊ शकते. वैभव सूर्यवंशीच्या शेजारी बसून फोन वापरल्याने हा वाद अधिक वाढला असून आयपीएल गव्हर्निंग कौन्सिल यावर अंतिम निर्णय घेईल.

# रांजणगाव महागणपती मंदिर साडेतीन महिने दर्शनासाठी बंद; १५ एप्रिलपासून कामांना सुरुवात

**पोपटराव पाचंगे**

रांजणगाव गणपती, ता. १३ : अष्टविनायकापैकी एक असलेल्या श्री क्षेत्र रांजणगाव गणपती (ता. शिरूर) येथील श्री महागणपती मंदिर येथे व्यापक जतन व दुरुस्तीच्या कामांना सुरुवात होत असून, त्यासाठी मंदिर येत्या ३१ जुलैपर्यंत म्हणजे साडेतीन महिने भाविकांना दर्शनासाठी बंद ठेवण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला आहे.

महाराष्ट्रातील सात मंदिरांच्या विकास आराखड्याअंतर्गत हा प्रकल्प राबविण्यात येत आहे. याबाबतची माहिती पुरातत्व विभागाचे सहाय्यक संचालक डॉ. विलास वहाणे यांनी रांजणगाव येथे आज मंदिर सभागृहात आयोजित पत्रकार परिषदेत दिली. या पत्रकार परिषदेला तहसीलदार बाळासाहेब म्हस्के, रांजणगाव एम



आयडीसीचे पोलीस निरीक्षक महादेव वाघमोडे व देवस्थान ट्रस्टचे विश्वस्त मंडळ आदी उपस्थित होते.

विभागीय आयुक्त चंद्रकांत पुलकुंडवार यांच्या अध्यक्षतेखालील उच्चस्तरीय समिती तसेच जिल्हास्तरीय समितीच्या मान्यतेनंतर पुरातत्व विभागाकडून मंदिराच्या मुख्य गाभाऱ्याची संरचना, सभामंडप तसेच परिसरातील पायाभूत सुविधांची दुरुस्ती व सुशोभीकरणाचे काम हाती घेतले जाणार आहे. त्यानुसार महागणपती मंदिर येत्या ३१ जुलैपर्यंत म्हणजे साडेतीन महिने भाविकांना दर्शनासाठी पूर्णतः बंद ठेवण्यात येणार आहे.

त्याअनुषंगाने बुधवार, दि. १५ एप्रिल पासून ३१ जुलै २०२६ पर्यंत मंदिर भाविकांना दर्शनासाठी पूर्णतः बंद राहणार आहे. या कालावधीत मंदिरातील नित्यपूजा, धार्मिक विधी आणि परंपरागत सेवा नियमितपणे सुरू राहतील, मात्र कोणत्याही भाविकांना मंदिर परिसरात प्रवेश दिला जाणार नाही. भाविकांची गैरसोय टाळण्यासाठी प्रशासनाकडून विशेष उपाययोजना करण्यात येत असून, मंदिराबाहेरील ठिकाणी एलईडी स्क्रीनद्वारे थेट दर्शनाची सुविधा उपलब्ध करून दिली जाणार आहे. त्यामुळे दूरवरून येणाऱ्या भाविकांना किमान एलईडी स्क्रीनद्वारे दर्शनाची सोय मिळणार आहे.

सुरक्षेच्या दृष्टीने, मंदिर परिसरात मोठ्या प्रमाणावर काम सुरू असणार असल्यामुळे, संवेदनशील भागांमध्ये सुरक्षा उपाय उभारण्यात येणार आहेत. कामाच्या ठिकाणी अनधिकृत प्रवेश पूर्णतः बंद ठेवण्यात येणार असून, प्रशासनाकडून विशेष देखरेख ठेवली जाणार आहे. तीन महिन्यांच्या कालावधीत मुख्य दुरुस्तीची कामे पूर्ण करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. त्यानंतर उर्वरित किरकोळ कामे टप्प्याटप्प्याने सुरू राहतील, असेही यावेळी सांगण्यात आले.

दरम्यानच्या कालावधीत मंदिर व मंदिर परिसरातील कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्याची विशेष दक्षता महसूल व पोलीस प्रशासनाकडून घेतली जाणार असल्याचे तहसीलदार बाळासाहेब म्हस्के व रांजणगावचे पोलीस निरीक्षक महादेव वाघमोडे यांनी यावेळी सांगितले.

# आशा भोसले अनंतात विलीन; शिवाजी पार्कवर शासकीय इतमामात अखेरचा निरोप

**मुंबई, ता. १३ :** संगीत विश्वातील एक तेजस्वी तारा निखळला आहे. भारतीय संगीत क्षेत्राला आपल्या आवाजाने समृद्ध करणाऱ्या गानसम्राज्ञी आशा भोसले आज कायमच्या आपल्यातून निघून गेल्या आहेत. सोमवारी, १३ एप्रिल रोजी मुंबईतील शिवाजी पार्क येथे शासकीय इतमामात त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी उपस्थित असलेले राजकीय नेते, सिने-कलाकार आणि हजारो चाहत्यांच्या उपस्थितीत वातावरणात प्रचंड शोकाकुल शांतता पसरली होती. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि सुनेत्रा पवार यांनी त्यांना श्रद्धांजली वाहिली. यावेळी गायक शानने आपल्या सुरांनी आशाताईंना भावपूर्ण निरोप दिला.

आशा भोसले यांच्या निधनामुळे



संपूर्ण देशावर शोककळा पसरली आहे. भारतीय संगीतातील एक सुवर्णयुग आज खऱ्या अर्थाने संपले आहे. १२ एप्रिलला, रविवारी त्यांचे निधन झाल्यानंतर, आज सोमवारी (१३ एप्रिल) मुंबईतील शिवाजी पार्क येथे त्यांच्यावर शासकीय इतमामात अंत्यसंस्कार करण्यात आले.

आशा भोसलेंचे पार्थिव लोअर परळ येथील त्यांच्या निवासस्थानी अंत्यदर्शनासाठी ठेवण्यात आले होते, जिथे संगीत, कला आणि राजकीय क्षेत्रातील अनेक दिग्गजांनी त्यांचे शेवटचे दर्शन घेतले. त्यानंतर शिवाजी पार्क येथे, कुटुंबीय व चाहत्यांच्या उपस्थितीत या महान गायिकेला निरोप देण्यात आला. आशा भोसले यांना अखेरचा निरोप देण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार उपस्थित होते. त्याचबरोबर आमिर खान, विकी कौशल, आशा भोसलेंची बहीण उषा मंगेशकर उपस्थित होत्या. गायक शानने यावेळी गाणे गात आशाताईंना अखेरचा निरोप दिला.

दरम्यान, मुंबई पोलिसांनी आशाताईंना मानवंदना दिली. त्यानंतर आशाताईंच्या पार्थिवाला त्यांचे सुपूत्र आनंद भोसले यांनी मुखाग्नी दिला. आशाताईंना शेवटचा निरोप देताना उपस्थितांचे डोळे पाणावले होते.

# मद्यधुंद कार चालकाकडून किरकोळ वादातून बस चालकाला चिरडून मारले

## उरुळी देवाची परिसरातील घटना; आरोपी कार चालकाविरुद्ध गुन्हा

**हडपसर, ता. १३ :** हडपसर-सासवड रस्त्यावर रस्ता देण्याच्या किरकोळ कारणावरून झालेल्या वादाचे पर्यवसन एका तरुणाच्या हत्येत झाले आहे. मद्यधुंद अवस्थेत असलेल्या कार चालकाने माणुसकीला काळीमा फासत बस चालकाच्या अंगावर दोनदा गाडी घालून त्याला चिरडले.




सागर बाळासाहेब सायकर (रा. शेवाळवाडी, हडपसर) असे मृत्युमुखी पडलेल्या बस चालकाचे नाव आहे. या प्रकरणी मोटार चालक कृष्णा गोपाळ कोईलवाड (वय-३०, रा. बोथरी, जि. लातूर) याच्या विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला. याबाबत विजय तानाजी शिर्के (वय ४१, रा. सातववाडी, हडपसर) यांनी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे.


पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, सागर सायकर आणि त्यांचे सहकारी विजय शिर्के हे खासगी बसवर चालक म्हणून काम करतात. रविवारी मध्यरात्री साडेबाराच्या सुमारास ते दोन बसमधून वडकी नाला परिसरातील महिलांना अक्कलकोटला देवदर्शनासाठी घेऊन जाणार होते. हडपसर-सासवड रस्त्यावर आरोपी कृष्णा कोईलवाड याने आपली मोटार बसच्या आडवी लावून रस्ता अडवला होता. सागर सायकर यांनी गाडी बाजूला घेण्याबाबत विचारणा केली असता, मद्यधुंद कोईलवाडने त्यांना अश्लील शिवीगाळ करण्यास सुरुवात केली. वाद वाढल्याने सायकर बसमधून खाली उतरले. यावेळी कोणताही विचार न करता आरोपीने आपली मोटार थेट सायकर यांच्या अंगावर घातली. धडक बसल्यानंतर सायकर यांनी गाडीचे बोनेट पकडले, मात्र आरोपीने त्यांना काही अंतरापर्यंत फरफटत नेले.

दरम्यान, अशा परिस्थितीत मोटार चालक कोईलवाडने कोणाताही विचार न करता. पुन्हा त्यांच्या अंगावर मोटार नेली. या घटनेत ते गंभीर जखमी झाले. गंभीर जखमी झालेल्या सायकर यांना तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले. उपचारांपूर्वीच त्यांचा मृत्यू झाला होता. अपघातानंतर पसार झालेल्या मोटार चालकाचा शोध घेण्यात येत असून, पोलीस उपनिरीक्षक जाधव तपास करत आहेत.

# मंगळसूत्र लूट प्रकरणातील आरोपीला ३० हजारांच्या जातमुचलक्यावर जामीन मंजूर

**शिक्रापूर, ता. १३ :** साताऱ्यातील एका महिलेच्या गळ्यातील मंगळसूत्र दोघांनी लुटण्याची घटना २८ ऑगस्ट २०२५ रोजी घडली होती. सातारा पोलिसांनी या गुन्ह्यातील एका आरोपीला शिक्रापूर (ता. शिरूर) येथून त्वरित अटक केली होती. या गुन्ह्यातील एका आरोपीला पुणे जिल्हा व सत्र न्यायालयाने ३० हजार रुपयांच्या जातमुचलक्यावर जामीन मंजूर केला आहे. हे आदेश शिरूर सत्र न्यायालयाचे न्यायाधीश एस पी पोळ यांनी दिले आहेत. अशी माहिती ॲड. सर्वेश निकम व ॲड. हर्षवर्धन दरेकर यांनी दिली.

अमर धुळप्पा केरे असे जामीन मंजूर झालेल्याचे नाव आहे. याप्रकरणी सातारा शहर पोलीस ठाण्याचे पोलीस कर्मचारी सुजित पांडुरंग भोसले (वय ३७) यांनी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, साताऱ्यातील एका महिलेच्या गळ्यातील मंगळसूत्र लुटण्याच्या गुन्ह्याचा तपास सुरू होता. या प्रकरणातील आरोपी लखन पोपट भोसले व अमर धुळप्पा केरे यांचा शोध सुरू असताना, ते शिक्रापूर परिसरात असल्याची गुप्त माहिती पोलिसांना मिळाली. त्या अनुषंगाने पोलिसांचे विशेष पथक ३० ऑगस्ट २०२५ रोजी शिक्रापूर येथे दाखल झाले. भुजबळ नगर, मलठण फाटा परिसरात आरोपी लपून



बसल्याची खात्री झाल्यानंतर पोलिसांनी सापळा रचला.

अमर केरे याला ताब्यात घेतल्यानंतर त्याच्याकडून मिळालेल्या माहितीनुसार मुख्य आरोपी लखन भोसले याचा शोध सुरू करण्यात आला. सायंकाळी सुमारे ५.४५ वाजण्याच्या सुमारास लखन भोसले हा समोर येताच पोलिसांनी त्याला शरण येण्याचे आवाहन केले. मात्र, त्याने अचानक कमरेला लपवलेला धारदार सुरा काढून पोलिसांवर हल्ला चढवला. या हल्ल्यात पोलीस कर्मचारी सुजित भोसले व तुषार भोसले जखमी झाले. स्थिती गंभीर होत असताना आणि आरोपीने पोलिसांना ठार मारण्याचा प्रयत्न सुरूच ठेवल्याने, स्वसंरक्षणार्थ सुजित भोसले यांनी त्यांच्या सर्व्हिस पिस्तूलमधून एक गोळी झाडली. या गोळीबारात लखन भोसले गंभीर जखमी झाला. त्याला तत्काळ रुग्णालयात दाखल करण्यात आले; मात्र उपचारादरम्यान त्याचा मृत्यू झाला. या प्रकरणी लखन भोसले व अमर धुळप्पा केरे यांच्याविरोधात शासकीय कामात अडथळा निर्माण करणे, जीवघेणा हल्ला करणे यांसह विविध गंभीर कलमांखाली गुन्हा दाखल करण्यात आला होता. गुन्हा दाखल होताच, पोलिसांनी अमर धुळप्पा केरे याला अटक केली होती. दरम्यान, या गुन्ह्याचा खटला शिरूर सत्र न्यायालयात सुरु होता. आरोपी अमर केरे यांनी ॲड. सर्वेश निकम व ॲड. हर्षवर्धन दरेकर यांच्यामार्फत न्यायालयात जामिनासाठी अर्ज केला होता. या गुन्ह्यात आरोपी अमर केरे याचा कसल्याही प्रकारचा सहभाग नसून त्याला या प्रकरणात खोट्या पद्धतीने अडकवले आहे. असा युक्तिवाद ॲड. सर्वेश निकम यांनी न्यायालयात केला. हाच युक्तिवाद ग्राह्य धरून न्यायालयाने आरोपी अमर केरे यांना ३० हजार रुपयांच्या जातमुचलक्यावर जामीन मंजूर केला आहे.

## संक्षिप्त



### व्यंकटेश्वराला भक्ताचे भरभरून दान

**तिरुपती, ता. १३ :** हैदराबाद मधील एका भक्ताने सोमवारी तिरुमला तिरुपती देवस्थान श्री व्यंकटेश्वर प्राणदान ट्रस्टला १ कोटींहून अधिक रुपयांची देणगी दिली. या देणगीचा डिमांड ड्राफ्ट श्रीवारी मंदिरातील रंगनायकुला मंडपामध्ये देवस्थानचे अतिरिक्त कार्यकारी अधिकारी सी. व्यंकय्या चौधरी यांच्याकडे सुपूर्द करण्यात आला. अल्लुरी वर्मा यांनी तिरुमला तिरुपती देवस्थानमच्या ट्रस्टला १ कोटींहून अधिक रुपयांची देणगी दिली आहे. अशी माहिती मंदिराच्या प्रशासनाकडून जारी करण्यात आलेल्या अधिकृत निवेदनाद्वारे देण्यात आली आहे. वर्मा हे हैदराबाद येथील एका पोलाद निर्मिती कंपनीचे व्यवस्थापकीय संचालक असल्याची माहिती निवेदनामध्ये नमूद करण्यात आलेली आहे.नोव्हेंबर २००१ मध्ये स्थापन करण्यात आलेल्या श्री व्यंकटेश्वर प्राणदान ट्रस्टचा मुख्य उद्देश, हृदय, मूत्रपिंड (किडनी), मेंदू, कर्करोग आणि इतर जीवघेण्या आजारांनी ग्रस्त असलेल्या गरीब रुग्णांना मोफत वैद्यकीय सुविधा पुरवणे हा आहे. तिरुमला तिरुपती देवस्थान हे मंदिर जगातील सर्वात श्रीमंत तीर्थक्षेत्र म्हणून ओळखले जाते.

### महाराष्ट्राला मिळाली पहिली वंदे भारत स्लीपर; अश्विनी वैष्णव यांनी केली घोषणा



**पुणे, ता. १३ :** मुंबई, पुणेकरांचे वंदे भारत स्लीपर एक्सप्रेस ट्रेनमधून प्रवास करण्याचे स्वप्न आता लवकरच साकार होणार आहे. केंद्रीय रेल्वे मंत्रालयाकडून पहिली वंदे भारत स्लीपर ट्रेन सुरू करण्यास हिरवा कंदिल मिळाला आहे. अश्विनी वैष्णव यांनी मुंबई ते बंगळुरू दरम्यान ही सेवा सुरू होणार असल्याची घोषणा केलीय. ही ट्रेन छत्रपति शिवाजी महाराज टर्मिनस ते केएसआर बंगळुरू दरम्यान धावणार आहे. सध्या २२-२३ तास लागणारा प्रवास आता सुमारे १६ तासांत पूर्ण होण्याची शक्यता आहे. १६ डब्यांची ही ट्रेन ताशी १८० किमी वेगाने धावू शकते आणि सुमारे ८२३ प्रवासी एकावेळी प्रवास करू शकतील. रात्रीच्या वेळेत ही ट्रेन चालवली जाण्याची शक्यता आहे, ज्यामुळे आयटी क्षेत्रातील कर्मचाऱ्यांना मोठा फायदा होईल.

### भोंदू बाबाची शक्तीपीठ महामार्ग परिसरात ११ एकर जमीन



**नाशिक, ता. १३ :** भोंदू बाबा अशोक खरात याच्या मालमत्तेबाबत धक्कादायक माहिती समोर आलीय. पुणे, नाशिक, शिर्डीनंतर आता सोलापूर कनेक्शनही उघड झालंय. उत्तर सोलापूर तालुक्यातील कळमण गावात खरातने सुमारे ११ एकर जमीन खरेदी केल्याचं तपासात समोर आलंय. या व्यवहाराची किंमत २ कोटी १० लाखांपेक्षा अधिक असल्याची नोंद आहे. विशेष म्हणजे ही जमीन खरातच्या पत्नीच्या नावावर खरेदी करण्यात आलीय. या भागातून प्रस्तावित शक्तीपीठ महामार्ग जाणार असल्याची माहिती मिळाल्यानंतरच ही खरेदी झाल्याची शक्यता वर्तवली जातेय. स्थानिक बाजारभावापेक्षा तीनपट जास्त दराने जमीन खरेदी केल्यामुळे या व्यवहारावर संशय व्यक्त केला जातोय. या प्रकरणामुळे तपास यंत्रणांचे लक्ष आणखी वेधले गेले आहे.

### बिहारच्या निशांत कुमार यांना मुख्यमंत्री बनवण्याची मागणी



**बिहार, ता. १३ :** बिहारच्या राजकारणात मुख्यमंत्रीपदाबाबतचा सस्पेन्स अधिकच रंगतदार झालाय. नितीशकुमार यांच्या शपथविधीनंतर पुढील मुख्यमंत्री कोण, याबाबत चर्चा सुरू असतानाच निशांत कुमार यांचं नाव पुढे येतंय. जनता दलच्या समर्थकांनी पाटण्यात निशांत कुमार यांना मुख्यमंत्री बनवण्याची मागणी करत पोस्टर्स आणि होर्डिंग्ज लावलेत. बिहारला बुलडोझर नाही, तर तुमची सावली हवी, असा भावनिक संदेशही या पोस्टर्सवर देण्यात आलाय. मिशन डेव्हलप्ड बिहार-२०४० पूर्ण करण्यासाठी निशांत कुमारच योग्य, असा दावा कार्यकर्त्यांकडून केला जातोय. या पोस्टर्समुळे बिहारमधील राजकीय हालचालींना वेग आला असून, मुख्यमंत्रीपदाची चर्चा अधिकच तापली आहे.

# इंदापूरात अवैध मुरूम वाहतूक करणाऱ्या ट्रॅक्टरखाली चिरडून ६ वर्षांच्या चिमुरड्याचा मृत्यू

## संतप्त कुटुंबीयांचे पोलीस स्टेशनसमोर ठिय्या आंदोलन

आदित्य बोराटे

इंदापूर, ता. १३ : इंदापूर तालुक्यातील शेटफळ हवेली येथे एक भीषण अपघात घडला. अवैध मुरूम वाहतूक करणाऱ्या एका सुसाट ट्रॅक्टरने अवघ्या ६ वर्षांच्या निष्पाप मुलाला चिरडल्याची हृदयद्रावक घटना घडली आहे. या अपघातात मुलाचा जागीच मृत्यू झाला असून, या घटनेने केवळ शेटफळच नव्हे तर संपूर्ण इंदापूर तालुका सुन्न झाला आहे.

शेटफळ हवेली परिसरात गेल्या अनेक दिवसांपासून डोंगर पोखरून अवैध मुरूम उत्खनन आणि त्याची बेधडक वाहतूक सुरू आहे. सोमवारी दुपारच्या सुमारास असाच एक मुरूमने भरलेला ट्रॅक्टर भरधाव वेगाने जात असताना, या सहा वर्षांच्या



बालकाला त्याने काळ बनून धडक दिली. माफियांच्या या वेगापुढे त्या निष्पाप जीवाचा निभाव लागला नाही आणि त्याने जागीच प्राण गमावले.

या घटनेनंतर परिसरातील नागरिकांच्या संयमाचा बांध सुटला. वारंवार तक्रारी करूनही महसूल विभाग आणि पोलीस प्रशासन या अवैध वाहतुकीकडे डोळेझाक का करत आहे? असा सवाल स्थानिक विचारत आहेत.

धक्कादायक बाब म्हणजे, न्याय मिळत नसल्याचे पाहून संतप्त नातेवाईकांनी आपल्या पोटच्या गोळ्याचा मृतदेह थेट पोलीस स्टेशनच्या दारात आणून ठेवला. जोपर्यंत गुन्हेगारांवर आणि अवैध उत्खनन करणाऱ्यांवर कठोर कारवाई होत नाही, तोपर्यंत मृतदेह हलवणार नाही, असा पवित्रा घेत कुटुंबीयांनी ठिय्या आंदोलन केले.

गौण खनिज माफियांचे अर्थकारण प्रशासनातील काही घटकांच्या आशिर्वादाने फोफावत असल्याचा आरोप नवा नाही. नियमा धाब्यावर बसवून चालणारे हे ट्रॅक्टर अनेकदा परवाना नसलेल्या चालकांकडून चालवले जातात. वेळेची मर्यादा आणि जास्तीत जास्त खेपा टाकण्याच्या नादात हे चालक लोकवस्तीतूनही बेदरकारपणे वाहने पळवतात, ज्याचा बळी आज एका निष्पापाने दिला आहे.

दरम्यान, आता प्रश्न उरतो तो इतकाच की, या निष्पाप जीवाच्या मृत्युनंतर तरी सुस्त महसूल यंत्रणा जागी होणार का? की पुन्हा पुढच्या अपघाताची वाट पाहिली जाणार? माफियांच्या या 'खूनी' वेगाला लगाम घालण्याची आता वेळ आली आहे.

### डिझेलच्या दरात वाढ होणार? केंद्र सरकारचा मोठा निर्णय

**नवी दिल्ली, ता. १३ :** डिझेलच्या दरांबाबत मोठी बातमी समोर येत आहे. केंद्र सरकारने हाय-स्पीड डिझेलवरील निर्यात शुल्कात मोठी वाढ करण्याचा निर्णय घेतलाय.

केंद्राने डिझेलवर २४ रुपये प्रति लिटर निर्यात शुल्क आणि ३६ रुपये प्रति लिटर इन्फ्रा सेस वाढवलाय. यापूर्वी २६ मार्च रोजीही डिझेलवर २१.५० रुपये प्रति लिटर निर्यात शुल्क लावण्यात आले होते. आता ही रक्कम थेट ५५.५ रुपये प्रति लिटरपर्यंत वाढलीय.

या निर्णयामुळे देशांतर्गत इंधनाची उपलब्धता वाढवण्याचा प्रयत्न केला जातोय. मात्र, याचा थेट परिणाम ग्राहकांवर होण्याची शक्यता आहे. डिझेलचे दर वाढण्याची शक्यता व्यक्त होत असून, त्यामुळे सर्वसामान्यांच्या खिशाला मोठा फटका बसू शकतो.

# लोणी काळभोर येथे जास्त भाड्यावरून रॅपिडो चालकाचा राडा

## महिलेच्या पोटात लाथ मारत कुटुंबीयांवर हल्ला

**लोणी काळभोर, ता. १३ :** जास्त भाडे आकारण्यावरून झालेल्या वादातून कॅब चालकाने थेट प्रवाशांच्या कुटुंबावर हल्ला केल्याची धक्कादायक घटना लोणी काळभोर परिसरात ५ एप्रिल रोजी रात्री पावणे दहा वाजण्याच्या सुमारास घडली आहे. या प्रकारात महिलेला लाथाबुक्यांनी मारहाण करण्यात आली असून तिच्या पती व भावालाही दगडाने मारून गंभीर जखमी करण्यात आले आहे. या प्रकरणी आरोपी कॅब चालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी सरस्वती मल्लेश चलवादी (वय २९, रा. साई सृष्टी अपार्टमेंट, लोणी काळभोर) यांना भेटण्यासाठी त्यांचे नातेवाईक




आले होते. त्यानंतर रात्री सुमारे ९.४० वाजता त्यांची बहीण मनिषा हिने रॅपिडो ॲपद्वारे कॅब बुक केली. काही वेळातच संबंधित कॅब त्यांच्या सोसायटीत आली. मात्र, ॲपवर दाखवलेल्या २७१ रुपयांऐवजी चालकाने ४७५ रुपये भाडे मागितल्याने वाद झाला. त्यामुळे त्यांनी ती कॅब रद्द करून दुसरी कॅब बुक केली.

पहिला कॅब चालक संतप्त होऊन सोसायटी गेटजवळच थांबून राहिला. दुसरी कॅब आल्यानंतर त्याने त्या चालकाला बुकिंग रद्द करण्यास सांगत वाद घातला. यावेळी सरस्वती यांच्या पतीने तुमचे बुकिंग रद्द केले आहे, तुम्ही जाऊ शकता, असे सांगितल्यावर आरोपीने संतापून शिवीगाळ करत थेट त्यांच्यावर धाव घेतली.

वाद वाढत असताना सरस्वती यांनी मध्ये पडून तो सोडवण्याचा प्रयत्न केला असता, आरोपीने त्यांना शिवीगाळ करत पोटात लाथ मारली. त्यानंतर त्याने वैष्णवीच्या हातातील मोबाईल हिसकावण्याचा प्रयत्न केला. यावेळी सरस्वतींचे पती व भाऊ यशवंत यांनी हस्तक्षेप केला असता, आरोपीने दगड उचलून यशवंत यांच्या डोक्यात मारला. या हल्ल्यात यशवंत गंभीर जखमी झाले, तर पती धवल यांच्या हातालाही दगड लागून फ्रॅक्चर झाले. या घटनेची माहिती मिळताच, पोलिस घटनास्थळी दाखल झाले; मात्र आरोपी तेथून पसार झाला. जखमींना तत्काळ विश्वराज व शिवम रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले. या प्रकरणी लोणी काळभोर पोलीस ठाण्यात आरोपी कॅब चालकाविरुद्ध भारतीय न्याय संहिता कलम ११५ (२), १२५ (र), ३५१ (२) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### भरधाव टेम्पोची मोटारसायकलला जोरदार धडक ; तरुणाचा मृत्यू

विशाल शिंदे

नसरापूर, ता. १३ : भोर तालुक्यातील कुसगाव परिसरात रविवारी (ता.१२ एप्रिल २०२६ ) सायंकाळी भीषण अपघात घडून एका ३२ वर्षीय तरुणाचा मृत्यू झाला. भरधाव वेगाने येणाऱ्या टेम्पोने मोटारसायकलला समोरून धडक दिल्याने हा अपघात झाला असून या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, कुसगाव गावाच्या हद्दीत कोंढणपूर फाटा ते वेल्हा रोडदरम्यान सायंकाळी साडेचार वाजण्याच्या सुमारास हा अपघात घडला. आरोपी जयसिंग रावसाहेब विहाळे (वय-५०, रा. कात्रज, पुणे) हा त्याच्या ताब्यातील टाटा कंपनीचा टेम्पो भरधाव वेगात व निष्काळजीपणे चालवत होता. वाहतूक नियमांकडे दुर्लक्ष करत त्याने समोरून येणाऱ्या मोटारसायकलला जोरदार धडक दिली. या अपघातात मोटार सायकलस्वार सुमेरसिंग कडुसिंग पाटील (वय , सध्या रा. कुसगाव, ता. भोर; मूळ रा. बोदवड, जि. जळगाव) याच्या डोक्याला गंभीर दुखापत झाली. त्याला तातडीने उपचारासाठी हलविण्यात आले; मात्र उपचारादरम्यान त्याचा मृत्यू झाला. या अपघातात फिर्यादी परवेज खान (वय-४७) यांनाही किरकोळ दुखापत झाली असून मोटारसायकलचेही मोठे नुकसान झाले आहे.

या प्रकरणी परवेज खान यांनी दिलेल्या फिर्यादीवरून राजगड पोलिस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला असून आरोपी चालकाविरोधात कारवाई सुरू आहे. घटनेची नोंद रात्री करण्यात आली असून पुढील तपास पोलीस प्रशासन करत आहे.

# सोलापूरमध्ये शेततळ्यात बुडून बहिण भावाचा मृत्यू

**सोलापूर, ता. १३ :** दक्षिण सोलापूर तालुक्यातील कारकल येथे घडलेल्या दुर्दैवी घटनेने संपूर्ण परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. शेततळ्यात पोहण्यासाठी गेलेल्या बहीण-भावाचा बुडून मृत्यू झाल्याने गावावर शोककळा पसरली आहे. श्रवण वय १५ आणि श्रावणी वय १० अशी मृत मुलांची नावे असून, या घटनेमुळे एका कुटुंबाचा आधारच हरपला आहे.

काही वर्षांपूर्वी वडिलांचे अपघातात निधन झाल्यानंतर आई उषा अंकलगी या आपल्या दोन मुलांसह कारकल येथे राहत होत्या. रविवारी शाळेला सुट्टी असल्याने श्रवण आपल्या बहिणीसोबत वेळ घालवण्यासाठी घरी आला होता. दुपारच्या सुमारास दोघेही शेतातील शेततळ्याकडे गेले. पोहण्याची इच्छा आणि खेळण्याचा उत्साह यामुळे त्यांनी पाण्यात उतरण्याचा निर्णय



घेतला. सुरक्षिततेसाठी त्यांनी एक दोरी झाडाला बांधली आणि दुसरे टोक स्वतः च्या कमरेला बांधले होते. मात्र काही वेळातच झाडाला बांधलेली दोरी सुटली आणि दोघांचा आधार तुटला. पाण्याची खोली जास्त असल्याने दोघेही बाहेर येऊ शकले नाहीत आणि काही वेळातच त्यांचा बुडून मृत्यू झाला.

बराच वेळ झाला तरी मुलांचा आवाज न आल्याने आजीला संशय आला. त्यांनी शेततळ्याकडे जाऊन पाहिले असता दोन्ही मुले पाण्यात निश्चल अवस्थेत दिसून आली. आजीच्या ओरडण्याचा आवाज ऐकून आसपासचे शेतकरी तातडीने मदतीला धावले. त्यांनी मुलांना बाहेर काढून मंद्रुप ग्रामीण रुग्णालयात नेले, मात्र डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले. या घटनेमुळे गावात हळहळ व्यक्त होत असून सर्वत्र शोक व्यक्त केला जात आहे. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस करत आहेत.

# सासरच्या छळाला कंटाळून विवाहितेची आत्महत्या

**पुणे, ता. १३ :** ज्या घरात सुखी संसाराची स्वप्ने पाहिली, त्याच चार भिंतीत छळ होतो, तेव्हा जगण्यातील उमेद कशी संपते, याचा भीषण प्रत्यय पुण्यातील बिबवेवाडी भागात आला आहे. सासरच्या मंडळींकडून होणाऱ्या अतोनात शारीरिक आणि मानसिक जाचाला कँटाळून ३३ वर्षीय सुवर्णा सर्जेराव जाधव या तरुण विवाहितेने गळफास घेऊन आपली जीवनयात्रा संपवली. या घटनेने केवळ बिबवेवाडीच नव्हे, तर संपूर्ण पुणे शहर सुन्न झाले आहे.

सुवर्णा यांचा विवाह सर्जेराव जाधव (३८) यांच्याशी झाला होता. लग्नानंतर काही काळ सर्व काही सुरळीत वाटत असतानाच, सासरच्या मंडळींचे खरे रूप समोर आले. सुवर्णा यांनी सर्व काही नीट व्हाव म्हणून अनेकदा तडजोड केली, मात्र सासरच्यांची



निष्ठुरता कमी झाली नाही. गेल्या अनेक दिवसांपासून हा छळ असह्य झाला होता. पती सर्जेराव याने पत्नीची बाजू घेण्याऐवजी छळ करणाऱ्या नातेवाईकांनाच साथ दिल्याचे प्राथमिक तपासात समोर आले आहे. सासरच्या सात नातेवाईकांनी मिळून सुवर्णा यांचे जगणे मुश्किल केले होते. अखेर, सततचा अपमान आणि न थांबणाऱ्या त्रासापुढे हार मानून, त्यांनी राहत्या घरी मृत्यूला कवटाळले.

दरम्यान, बिबवेवाडी पोलिसांनी तातडीने तपास करत सुवर्णा यांच्या पतीसह सासरच्या सात जणांना बेड्या ठोकल्या आहेत. यामध्ये सासरे माणिकभाऊ जाधव (७०), सासू जयश्री (६५) यांच्यासह इतर नातेवाईकांचा समावेश आहे.

# कुंजीरवाडीत पैशांच्या वादातून तरुणावर जीवघेणा हल्ला; चौघांविरुद्ध गुन्हा

**लोणी काळभोर, ता. १३ :** पैशांच्या वादातून तरुणावर लाथाबुक्क्यांनी मारहाण करत दगडाने डोक्यावर प्रहार केल्याची धक्कादायक घटना घडली आहे. ही घटना कुंजीरवाडी (ता. हवेली) ग्रामपंचायत हद्दीतील मगरवस्ती परिसरात शुक्रवारी (ता. १०) सायंकाळी साडेपाच वाजण्याच्या सुमारास घडली आहे. या घटनेमुळे परिसरात खळबळ उडाली असून लोणी काळभोर पोलिस ठाण्यात चौघांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सुरज गोपीनाथ घोळवे (वय ३०), गोपीनाथ अजिनाथ घोळवे (वय ५०), राजू बिट्टू घोळवे (वय ३५) व जनाबाई गोपीनाथ घोळवे (वय ४६, सर्व रा. कुंजीरवाडी, ता. हवेली) अशी गुन्हा दाखल करण्यात आलेल्यांची नावे आहेत. याप्रकरणी आदेश अंकुश सोनवणे (वय १९, रा. शेवाळवाडी फाटा, मांजरी बुद्रुक)



यांनी लोणी काळभोर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी आदेश सोनवणे यांच्या वडिलांकडे ट्रक ड्रायव्हर म्हणून काम करणाऱ्या सुरज घोळवे याने काही महिन्यांपूर्वीचे कामाचे पैसे मागण्यासाठी फोन करून शिवीगाळ केली होती. याबाबत जाब विचारण्यासाठी आदेश सोनवणे हा सुरजच्या घरी गेले होते. तेथे सुरजला पैसे मागण्याबाबत विचारणा करताच वाद वाढला. त्याचवेळी राजू बिट्टू घोळवे याने मागून पकडले, तर सुरजने शिवीगाळ करत पैशांची मागणी केली. आदेश यांनी पैसे देण्यास नकार दिल्यानंतर सुरज व त्याचे नातेवाईक आक्रमक झाले.

दरम्यान, सुरजची आई जनाबाई घोळवे तसेच गोपीनाथ घोळवे व इतरही तेथे जमा झाले. सर्वांनी मिळून आदेश यांना शिवीगाळ करत लाथाबुक्क्यांनी बेदम मारहाण केली. यावेळी सुरज घोळवे याने हातातील दगड उचलून आदेश यांच्या डोक्यावर प्रहार केला, ज्यामुळे त्यांच्या डोक्याला गंभीर दुखापत झाली. हल्ल्यानंतर आरोपींनी पुन्हा आमच्या नादी लागलास तर जिवंत सोडणार नाही, अशी धमकी दिली .

जखमी अवस्थेत आदेश यांनी लोणी काळभोर पोलीस ठाणे गाठले, आणि आरोपींच्या विरोधात तक्रार दिली. त्यानुसार सुरज घोळवे, गोपीनाथ घोळवे, राजू घोळवे व जनाबाई घोळवे यांच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# थेऊर येथे ऊस पिकाची नासधूस करून मारहाण; तिघांवर गुन्हा दाखल

**लोणी काळभोर, ता. १३ :** वडिलोपार्जित शेतजमिनीच्या वादातून हे शेत आमचेच आहे, तुम्ही येथे येऊ नका, असे म्हणून मोठा तणाव निर्माण झाला असून, जबरदस्तीने ट्रॅक्टर घालून ऊस पिकाची नासधूस केल्याची तसेच मारहाणीची गंभीर घटना घडली आहे. ही घटना थेऊर (ता. हवेली) परिसरात रविवारी (ता.१२) सकाळी नऊ वाजण्याच्या सुमारास घडली आहे. या प्रकरणी लोणी काळभोर पोलिस ठाण्यात तीन जणांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

शरद कुंजीर, तुकाराम धोंडीबा कुंजीर व सागर उत्तम कुंजीर (सर्व रा. दळवी वस्ती,थेऊर ता. हवेली) अशी गुन्हा दाखल करण्यात आलेल्यांची नावे आहेत. याप्रकरणी ओंकार चंद्रकांत कुंजीर (वय २३, रा. थेऊर) यांनी लोणी काळभोर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी ओंकार कुंजीर यांची थेऊर ग्रामपंचायत हद्दीतील गट क्रमांक ११८ येथील सुमारे तीन एकर वडिलोपार्जित शेतजमीन आहे. या जमिनीवर ओंकार, त्यांची आई, चुलते-चुलती व इतर कुटुंबीयांसह शेती करतात. या जमिनीपैकी दीड एकर क्षेत्रावरून त्यांच्या नातेवाईकांसोबत वाद सुरू असून, याबाबत भूमी अभिलेख कार्यालयात मोजणी प्रकरण चालू होते. या प्रकरणात ३० मार्च २०२६




रोजी निकाल त्यांच्या विरोधात लागला असला, तरी त्यांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे अपील दाखल केले असून सध्या संबंधित जमिनीचा ताबा त्यांच्या कुटुंबाकडे असल्याचे सांगण्यात आले आहे.

दरम्यान, डिसेंबर २०२५ मध्ये या शेतात ऊस पिकाची लागवड करण्यात आली होती. सध्या चार महिन्यांचे झालेले हे पीक जोमात वाढत असतानाच १२ एप्रिल रोजी सकाळी सुमारे ९ वाजता धक्कादायक प्रकार घडला. फिर्यादींचे चुलते कांताराम कुंजीर व चुलती राणी कुंजीर शेतात पाणी देण्यासाठी गेले असता, त्यांच्या ऊस पिकामध्ये एक ट्रॅक्टर घालून नांगरणी सुरू असल्याचे दिसून आले.

याबाबत विचारणा केली असता, तेथे उपस्थित असलेले तुकाराम धोंडीबा कुंजीर, सागर उत्तम कुंजीर व इतरांनी हे शेत आमचेच आहे, तुम्ही येथे येऊ नका, असे म्हणत शिवीगाळ केली. तसेच फिर्यादींच्या चुलत्यावर हाताने मारहाण करून धमकी दिली आहे. या घटनेची माहिती मिळताच ओंकार कुंजीर व त्यांचा भाऊ आकाश घटनास्थळी पोहोचले. तेव्हा शरद कुंजीर हा महिंद्रा कंपनीच्या लाल रंगाच्या ट्रॅक्टर (क्रमांक चक१२ ग १९९३) द्वारे ऊस पिकात नांगरणी करत असल्याचे दिसून आले. या घटनेत सुमारे पाऊण एकर ऊस पिकाचे मोठे नुकसान झाले आहे. परिस्थिती चिघळत असल्याने ११२ क्रमांकावर कॉल करून पोलिसांना पाचारण करण्यात आले. काही वेळातच पोलिस घटनास्थळी दाखल झाले आणि त्यांनी पाहणी केली. त्यानंतर फिर्यादी ओंकार चंद्रकांत कुंजीर यांनी लोणी काळभोर पोलीस ठाण्यात तक्रार दिली. त्यानुसार शरद कुंजीर, तुकाराम धोंडीबा कुंजीर, सागर उत्तम कुंजीर यांच्यासह इतरांविरोधात जबरदस्तीने शेतात घुसखोरी, मारहाण, धमकी व पिकांचे नुकसान केल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# आळंदी म्हातोबाची येथील १६ वर्षीय मुलगी बेपत्ता; अज्ञात व्यक्तीविरुद्ध गुन्हा

**लोणी काळभोर, ता. १३ :** अल्पवयीन मुलींच्या अज्ञान वयाचा फायदा घेऊन तिला कशाचेतरी अमिष दाखवून कोणीतरी अज्ञात इसमाने पळवून नेल्याची घटना घडली आहे. ही घटना आळंदी म्हातोबाची (ता. हवेली) परिसरात घडली असून ६ एप्रिल रोजी पहाटे सुमारे ३.३५ वाजण्याच्या सुमारास घडली आहे. लोणी काळभोर पोलीस ठाण्यात अज्ञात व्यक्तीविरुद्ध अपहरणाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याप्रकरणी एका ३४ वर्षीय महिलेने फिर्याद दिली आहे.




पोलीसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी यांची १६ वर्षांची मुलगी ५ एप्रिल २०२६ रोजी रात्री घरात झोपली होती. मात्र, ६ एप्रिल रोजी पहाटे सुमारे ३.३५ वाजता ती घरातून कोणालाही न सांगता बेपत्ता झाल्याचे निदर्शनास आले. कुटुंबीयांनी तात्काळ परिसरात तसेच नातेवाईकांकडे शोध घेतला, मात्र मुलगी सापडली नाही. विशेष म्हणजे, यापूर्वीही २५ फेब्रुवारी २०२६ रोजी ही मुलगी घरातून निघून गेली होती आणि ११ मार्च रोजी परत आली होती. त्यामुळे यावेळीही ती परत येईल, असा कुटुंबीयांचा समज होता. मात्र, अनेक दिवस उलटूनही ती परत न आल्याने अखेर पोलीसांत तक्रार दाखल करण्यात आली.

बेपत्ता मुलगी मध्यम बांध्याची, सावळ्या वर्णाची असून तिची उंची सुमारे ५.३ फुट आहे. ती जांभळ्या रंगाचा पंजाबी ड्रेस व गुलाबी रंगाचे बूट परिधान केलेले आहेत. तिला मराठी व हिंदी भाषा येते.

कोणीतरी अज्ञात व्यक्तीने मुलीच्या अल्पवयाचा फायदा घेत तिला अमिष दाखवून फुस लावून पळवून नेल्याचा संशय व्यक्त करण्यात आला आहे. या प्रकरणी लोणी काळभोर पोलीसांनी भारतीय न्याय संहिता २०२३ च्या कलम १३७ (२) अंतर्गत गुन्हा दाखल केला असून, पुढील तपास सुरू आहे.

# गुंजवणी धरणात विजेच्या धक्क्याने दोन सख्ख्या भावांचा मृत्यू

**विशाल शिंदे**

राजगड, ता. १३ : राजगड तालुक्यातील घेवंडे येथे रविवारी (दि. १२) अत्यंत दुर्दैवी घटना घडली असून, शेतात पिकांना पाणी देण्यासाठी कृषिपंप बसविताना विजेचा धक्का लागून दोन सख्ख्या भावांचा पाण्यात बुडून मृत्यू झाला. या घटनेत निव्ही-घेवंडे ग्रुप ग्राम पंचायतीचे माजी सरपंच दामाजी भाऊराव गायकवाड (वय ५०) आणि त्यांचे बंधू दत्तात्रेय उर्फ दत्तू भाऊराव गायकवाड (वय ५५) यांचा समावेश आहे.



मिळालेल्या माहितीनुसार, घेवंडे गावातील हे दोघे भाऊ गुंजवणी धरणाच्या पाणलोट (फुगवटा) क्षेत्रात शेतीसाठी कृषिपंप बसविण्याचे काम करीत होते. दुपारच्या सुमारास मोटार दुरुस्तीचे काम सुरू असताना अचानक विद्युत प्रवाह आल्याने दोघांनाही जोराचा विजेचा धक्का बसला. या धक्क्यामुळे त्यांचा तोल जाऊन ते थेट खोल पाण्यात पडले.

ही घटना लक्षात येताच स्थानिक ग्रामस्थांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेतली आणि बचावकार्य सुरू केले. घटनेची माहिती मिळताच वेल्हे पोलीस स्टेशनमार्फत हवेली आपत्ती व्यवस्थापन बचाव पथकाला कळविण्यात आले. त्यानंतर पोलीस अधिकारी अमित देशमुख, राजेंद्र आवदे, शुभम कदम तसेच बचाव पथकातील सदस्य घटनास्थळी दाखल झाले.

सुमारे पाच तासांच्या अथक प्रयत्नांनंतर सायंकाळी अंदाजे ६.३० वाजण्याच्या सुमारास दामाजी गायकवाड यांचा मृतदेह शोधण्यात यश आले. मात्र, त्यांचे बंधू दत्तात्रेय गायकवाड यांचा मृतदेह उशिरापर्यंत सापडू शकला नाही. अंधार पडल्यामुळे शोधकार्यात अडथळे निर्माण झाले असून रात्री सुमारे १० वाजता शोधमोहीम थांबविण्यात आली. पुढील शोधमोहीम सोमवारी (दि. ) सकाळी पुन्हा सुरू करण्यात येणार आहे.

या बचावकार्यात हवेली आपत्ती व्यवस्थापन पथकाचे अध्यक्ष तानाजी भोसले, गणेश सपकाळ (पोलीस पाटील), उत्तम पिसाळ, विक्रम बिरामने, संदीप सोलस्कर, संजय चोरघे, समीर जाधव आदींनी सक्रिय सहभाग घेतला. दामाजी गायकवाड हे निव्ही-घेवंडे समूह ग्रामपंचायतीचे माजी सरपंच म्हणून ओळखले जात होते. दरम्यान, त्यांच्या अकाली निधनामुळे घेवंडे परिसरासह संपूर्ण राजगड तालुक्यात शोककळा पसरली असून, दोन्ही भावांच्या निधनाबद्दल सर्वत्र हळहळ व्यक्त केली जात आहे.

# थेऊर फाटा चौकात एकाला बेदम मारहाण ; पाच जणांवर गुन्हा दाखल

**लोणी काळभोर, ता. १४ :** पुणे-सोलापूर महामार्गावरील थेऊर फाटा (ता. हवेली) चौकात भरधाव कारने धडक दिल्यानंतर मद्यधुंद अवस्थेत चालक व त्याच्या साथीदारांनी तू बीड-बार्शीतला आहेस, तुला काय भरपाई देऊ? असे म्हणत एकट्या चालकाला बेदम मारहाण केल्याची घटना घडली आहे. या प्रकारामुळे काही काळ परिसरात तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. पोलिसांनी या प्रकरणी मुख्य चालकासह इतर साथीदारांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.



कार चालक सोहम नितीन यादव (वय ३०, रा. भोसरी) व त्याच्या सहकाऱ्यांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तर त्रिंबक नारायण कांबळे (वय ३४, रा. कोलवडी, ता. हवेली) असे जखमी झालेल्या तरुणाचे नाव आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी त्रिंबक कांबळे हे कार खरेदी-विक्रीचा व्यवसाय करतात. ३ एप्रिल २०२६ रोजी रात्री सुमारे ९ वाजता ते आपल्या मारुती सुझुकी झेन कारने कुंजीरवाडीहून कोलवडीकडे जात होते. थेऊर फाटा चौकात सिग्नलला थांबले असताना पाठीमागून भरधाव वेगात आलेल्या स्विफ्ट कारने त्यांच्या वाहनाला जोरदार धडक दिली. या धडकेनंतर संबंधित कारमधून उतरलेल्या चालकाने सुरुवातीला गाड्या साईडला घेऊ आणि नुकसान पाहू असे सांगितले. मात्र, काही क्षणातच कारमधील चार ते पाच इसम खाली उतरून कांबळे यांच्याशी वाद घालू लागले. ते सर्वजण मद्यधुंद अवस्थेत होते. चालक सोहम नितीन यादव याने तू बीड-बार्शीतला आहेस, तुला काय भरपाई देऊ? असे म्हणत शिवीगाळ केली आणि कानाखाली मारहाण केली. त्यानंतर इतर साथीदारांनीही मिळून लाथाबुक्क्यांनी बेदम मारहाण केली.

घटनास्थळी उपस्थित ट्रॉफिक पोलिसांनी तत्काळ हस्तक्षेप करत कांबळे यांना वाचवले. मात्र आरोपी ऐकण्याच्या मनःस्थितीत नसल्याने परिस्थिती चिघळली. त्यानंतर ११२ वर कॉल केल्यानंतर स्थानिक पोलीस घटनास्थळी दाखल झाले आणि सर्वांना लोणी काळभोर पोलीस ठाण्यात आणण्यात आले. या प्रकरणी लोणी काळभोर पोलिस ठाण्यात सोहम यादव व त्याच्या अन्य चार अनोळखी साथीदारांविरुद्ध मोटार वाहन अधिनियम १९८८ मधील कलम ११९, १७७, १८४, १८५ तसेच भारतीय न्याय संहिता २०२३ मधील कलम ११५ (२), १२५, १८९(२), १९०, १९१ (२), २८१, ३५२ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# मावळमध्ये भेसळयुक्त आंबा पल्प जप्त; एफडीएची कारवाई; छाप्यात लाखोंचा साठा नष्ट

**पुणे, ता. १३ :** उन्हाळ्यात नागरिकांना सुरक्षित अन्न मिळावे, यासाठी अन्न व औषध प्रशासनाकडून विशेष मोहीम राबविण्यात येत आहे. या मोहिमेदरम्यान मावळ तालुक्यातील एका ठिकाणी भेसळयुक्त आंबा पल्प तयार केल्याचा प्रकार उघडकीस आला. या कारवाईत एकूण २ लाख २३ हजार १९६ रुपये किमतीचा साठा जप्त करण्यात आला.



खेड तालुक्यातील राक्षेवाडी आणि मावळमधील उरसे येथे अन्न व औषध प्रशासनाने गुप्त माहितीच्या आधारे छापे टाकले. भेसळ माफियांचा हा कारखाना पाहून अधिकारीही अवाक झाले. जप्त करण्यात आलेल्या या साठ्याची किंमत लाखोंच्या घरात आहे. स्वस्त दरात 'मँगो पल्प' म्हणून विकला जाणारा हा पदार्थ प्रत्यक्षात केवळ रसायन आहेत.

तपासणी दरम्यान समोर आलेली माहिती अंगावर काटा आणणारी असूनखर्च वाचवण्यासाठी पल्पमध्ये साखरेऐवजी अत्यंत स्वस्त आणि निकृष्ट दर्जाचे गोड पदार्थ वापरले जात होते. आमरसाला रंग देण्यासाठी रासायनिक रंगांचा बेसुमार वापर केला जात होता. चव वाढवण्यासाठी त्यात गाईचे दूध आणि इतर रासायनिक घटक मिसळले जात होते, जे अत्यंत अस्वच्छ परिस्थितीत साठवले होते.

हा भेसळयुक्त पल्प प्रामुख्याने ग्रामीण भागातील हॉटेल्स आणि किरकोळ विक्रेत्यांना स्वस्तात विकला जात होता. आपण 'ताजा आमरस' समजून जे खातो, त्यातून विषबाधा, तीव्र पोटदुखी आणि उलट्यांचा त्रास होऊ शकतो. तज्ज्ञांच्या मते, यात वापरलेले रासायनिक रंग दीर्घकाळ पोटात गेल्यास यकृत आणि किडनीवर गंभीर परिणाम होऊ शकतात, अगदी कर्करोगाचा धोकाही नाकारता येत नाही.




Printed & Published By Janardan Gowardhan Dandge on behalf of Pune Prime News Network and printed at SHREE SAMARTH PRINTERS, 686, SHIVGANGA CHAMBERS, SHOP NO. G1, BUDHWAR PETH PUNE, 411002, Maharashtra. and publishded at Shop no 201, Sunrise Complex, Pune-Solapur Road. loni kalbhor(station), Tal.: Haveli Dist.: Pune-412201 Maharashtra) Editor- Janardhan Dandge (Mo. No. 9922232222).

मुद्रक, प्रकाशक व संपादक : जनार्दन गोवर्धन दांडगे. हे दैनिक पुणे प्राईम न्यूज नेटवर्क करीता मुद्रक आणि प्रकाशक जनार्दन गोवर्धन दांडगे यांनी श्री स्वामी समर्थ प्रिंटर्स, ६८६, शिवगंगा चेंबर्स, शॉप नं. जी १, बुधवार पेठ, पुणे - ४११००२ महाराष्ट्र येथे मुद्रित केले व पुणे प्राईम न्यूज नेटवर्क, शॉप नं २०१, सनराईज कॉम्प्लेक्स, पुणे सोलापूर रोड, लोणी काळभोर (स्टेशन), ता. हवेली, जि. पुणे- ४१२२०१ येथे प्रकाशित केले. 'पुणे प्राईम न्यूज' मधील लेखांचे हक्क राखून ठेवले आहेत. पुणे प्राईम न्यूज हे 'पुणे प्राईम न्यूज नेटवर्क'चे व्यापारचिन्ह आहे. (पीआरबी कायद्यानुसार जबाबदारी), दूरध्वनी : ९९२२२३२२२२, E Mail: puneprimenewsgmail.com.

## प्राईम लाईफ



### उन्हाळ्याच्या दिवसात कोकम सरबत पिण्याचे महत्त्व

उन्हाळ्यात पित्ताच्या समस्यांमध्ये सर्वाधिक वाढ होते. कोकणातील रतांबे म्हणजेच कोकम हे एक महत्त्वाचं फळ मानलं जातं. कोकणातील रतांबे बाजारात येतात तेव्हा, कोकणचा हा रानमेवा घरी नेण्यासाठी ग्राहकांची झुंबड उडते. रतांब्यापासून कोकमचा रस बनवण्याची सुरुवात होते तेव्हा, घरा-घरातून केवळ कोकमाच्या सुवास दरवळु लागतो. कोकम हे एक औषधी फळ मानले जाते. त्याचे वैज्ञानिक नाव गार्सिनिया इंडिका असे आहे. स्वयंपाकात, मसाल्यात, औषधात आणि तेलाच्या स्वरूपात रतांब्याचा वापर केला जातो. कोकमचा रस देखील खूप चविष्ट असतो. पारंपरिक असा हा कोकम सरबत उन्हाळ्यात बहुतांश घरात पाहायला मिळतो. उन्हाळ्यात बाहेरून आल्यावर, कोकम सरबत पिणे हे उत्तम मानले जाते.

कोकम सरबत जुलाबाच्या समस्येवर अतिशय उत्तम उपाय मानले जाते. कोकममध्ये अँटी-बॅक्टेरियल आणि अँटी-इंफ्लेमेटरी गुणधर्म भरपूर असतात.

कोकम सरबत उन्हाळ्यात अतिशय गुणकारी मानला जातो, यामुळे आपल्याला पित्ताचा त्रास कमी होण्यास मदत होते.

कोकम सरबत नियमित पिल्याने रक्तातील साखर नियंत्रित राहते.

कोकम खाण्याचे फायदे : कोकम आपल्या आहारात समाविष्ट केल्यामुळे, चयापचय वाढतो. तसेच वजन कमी होण्यासही मदत होते.

कोकम फळ खाल्ल्याने हृदयरोगाचा धोकाही मोठ्या प्रमाणात कमी होतो. खरंतर, कोकममध्ये बी-कॉम्प्लेक्स जीवनसत्त्वे, पोटॅशियम, मँगनीज आणि मॅग्नेशियम सारखे पोषक घटक आढळतात. हे सर्व घटक हृदयाचे ठोकेआणि रक्तदाब नियंत्रित करण्यास मदत करतात. यामुळे स्ट्रोक आणि हृदयरोग होण्याची शक्यता देखील कमी होते.

# साखळाई प्रकल्पावरून पाण्याचा संघर्ष भडकणार?

## घोड धरणातील हक्काच्या पाण्यासाठी शिरूर-श्रीगोंदा आमनेसामने

**योगेश मारणे**

न्हावरे, ता. १३ : तब्बल चार दशकांपासून रखडलेली साखळाई उपसा सिंचन योजना अखेर मार्गी लागण्याच्या उंबरठ्यावर असताना,या प्रकल्पाभोवती आता वादाचे ढगगडद होऊ लागले आहेत. शासनाकडून या महत्त्वाकांक्षी योजनेला हिरवा कँदील मिळताच एकीकडे श्रीगोंदा व अहमदनगर तालुक्यांत समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे तर दुसरीकडे घोड धरणाच्या मूळ लाभक्षेत्रातील शिरूर तालुक्यातील शेतकरी संतप्त झाले असून आमच्या हक्काच्या पाण्यावर डाका टाकूनका असा तीव्र आक्रोश व्यक्त होत आहे.



अहिल्यानगरचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या पुढाकारातून सुमारे १, २३४ कोटी रुपयांच्या या योजनेला मंजुरी मिळाली आहे. या योजनेअंतर्गत श्रीगोंदा व अहिल्यानगर तालुक्यातील सुमारे २९ गावांना पाणीपुरवठा करण्याचे नियोजन आहे.मात्र,या निर्णयामुळे घोड धरणाच्या पाण्यावर आधीपासून अवलंबून असलेल्या शेतकऱ्यांमध्ये अस्वस्थता वाढली आहे.

घोड धरणाची मूळ साठवण क्षमता सुमारे ७.१० टीएमसी असली,तरी प्रत्यक्षात उपलब्ध पाणी केवळ ५.५० टीएमसी असल्याचे सांगितले जाते. या मर्यादित पाण्यातून शेती, पिण्याचे पाणी आणि औद्योगिक गरजा भागवल्या जात असताना, नव्या योजनेसाठी ८.८ टीएमसी शेतीसाठी व ०.२० टीएमसी पिण्यासाठी पाणी आरक्षित करण्याचा प्रस्ताव आहे. यामुळे आधीच टंचाई सहन करतोय,आता आमचंच पाणी वळवलं तर आम्ही जगायचं कसं? असा संतप्त सवाल लाभधारक शेतकरी उपस्थित करत आहेत. या प्रकल्पामुळे शिरूर तालुक्यातील शेती, उद्योग आणि पिण्याच्या पाण्यावर गंभीर परिणाम होण्याची भीती व्यक्त केली जात आहे.त्यामुळे शेतकरी आक्रमक झाले असून, हक्काच्या पाण्यावर कुणाचाही अतिक्रमण चालणार नाही अशी ठाम भूमिका घेत तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा देण्यात आला आहे.

> घोड धरणावरून साखळाई योजना राबवणे हे शिरूरच्या विद्यमान लोकप्रतिनिधींचे सर्वात मोठे अपयश आहे.तर,अहमदनगरचे पालकमंत्री विखे पाटील यांनी नियोजित साखळाई योजनेमुळे त्यांचा मतदारसंघ भविष्यातील राजकीय दृष्ट्या अधिक सुरक्षित केला आहे. या योजनेमुळे घोड धरण लाभ क्षेत्रातील शेतकऱ्यांवर अन्याय होणार आहे. कारण, मागील दहा वर्षांपासून घोड धरणातील पाणीसाठा मे महिन्यातच संपुष्टात येतो.त्यामुळे शिरूर तालुक्यातील शेतकऱ्यांना येथून पुढे भीषण पाणीटंचाईला सामोरे जावे लागेल.
> - **बाळासाहेब घाटगे,** (अध्यक्ष-पश्चिम महाराष्ट्र शेतकरी संघटना)

> पूर्वी काही वर्षांपूर्वी स्वर्गीय बाळासाहेब विखे पाटील यांनीच घोड धरणावरून साखळाई योजनेला विरोध केला होता.तसेच त्यांनी ही योजना कधी सुरू होणार नाही, असेही सांगितले होते. त्यामुळे शिरूर तालुक्यातील शेतकऱ्यांचा नियोजित साखळाई योजनेला तीव्र विरोध आहे.
> - **दिलीपराव मोकाशी,** (माजी संचालक, घोडगंगा सहकारी साखर कारखाना)

# एमपीएससी भरती प्रक्रियेत मोठा बदल; राज्य मंत्रिमंडळाने घेतले ७ महत्त्वाचे निर्णय

**मुंबई, ता. १३ :** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली आज पार पडलेल्या मंत्रिमंडळ बैठकीत राज्याच्या विकासाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे ७ निर्णय घेण्यात आले आहेत. या निर्णयांचा मोठा फायदा स्पर्धा परीक्षेची तयारी करणाऱ्या उमेदवारांसह सामान्य नागरिकांना आणि आरोग्य क्षेत्राला होणार आहे. या बैठकीत मुख्यमंत्री फडणवीस यांच्यासोबत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, सुनेत्रा पवार आणि मंत्रिमंडळातील इतर ज्येष्ठ मंत्री उपस्थित होते.

या बैठकीतील सर्वात महत्त्वाचा निर्णय महाराष्ट्र लोकसेवा आयोग म्हणजेच एमपीएससीच्या भरती प्रक्रियेबाबत घेण्यात आला आहे. विकसित महाराष्ट्र २०४७ चे ध्येय समोर ठेवून भरती प्रक्रियेत मोठ्या सुधारणा केल्या जाणार आहेत. एमपीएससीच्या माध्यमातून भरल्या जाणाऱ्या संवर्गांची संख्या आता ५३ वरून थेट १५३ करण्यात आली आहे. यामुळे प्रशासकीय कामात सुसूत्रता येईल आणि संयुक्त परीक्षा योजनेत नवीन सेवांचा समावेश झाल्यामुळे भरती प्रक्रिया अधिक सोपी होणार आहे. युपीएससीच्या धर्तीवर महाजॉब्स पोर्टलद्वारे आता निपुण सेतू उपक्रम राबवण्यात येईल, ज्यामुळे नोकरी शोधणाऱ्या तरुणांना मोठा आधार मिळणार आहे.

नगरविकास विभागाने बदलापूर मधील स्टेडियमच्या आरक्षणात बदल करून तिथे वीज उपकेंद्रासाठी जागा उपलब्ध करून दिली आहे. यासाठी टाटा पॉवर कंपनीला ४ एकर जमीन हस्तांतरित करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. यामुळे परिसरातील विजेचा प्रश्न सुटण्यास मदत होईल. तसेच मुंबईत आयईएस स्किल टेक या खाजगी कौशल्य विद्यापीठाच्या स्थापनेला मंजुरी देण्यात आली आहे. या विद्यापीठामुळे राज्याला मनुष्यबळ प्राप्त होईल.

आरोग्य आणि वैद्यकीय शिक्षण विभागातही मोठे बदल सुचवण्यात आले आहेत. जपान इंटरनॅशनल को-ऑपरेशन एजन्सी म्हणजेच जायकाकडून ३७०८ कोटी रुपयांचे कर्ज घेऊन राज्यातील नर्सिंग आणि आरोग्य सेवा अधिक सक्षम केल्या जाणार आहेत. याशिवाय महाराष्ट्र वैद्यकीय परिषदेच्या नियमात बदल करून आता सदस्यांची नियुक्ती निवडणुकीऐवजी थेट शासनाकडून नामनिर्देशन पद्धतीने केली जाईल.

नियोजन विभागाने आकांक्षित जिल्हा कार्यक्रमात आता हिंगोली, जालना, पालघर, बीड, धुळे आणि परभणी या ६ जिल्ह्यांचा नव्याने समावेश केला आहे. यामुळे आता एकूण १७७ तालुक्यांमध्ये विकासाच्या योजना वेगाने राबवल्या जातील. सागरी जिल्ह्यातील मच्छिमारांसाठी ६१ कोटी २४ लाख रुपये खर्चून मूलभूत सोयीसुविधा उभारण्याचा निर्णयही या बैठकीत घेण्यात आला आहे. अशा प्रकारे या मंत्रिमंडळ निर्णयांनी राज्याच्या सर्वच क्षेत्रांना गती देण्याचा प्रयत्न केला आहे.

# सरसकट गुन्हे मागे न घेतल्यास रस्त्यावर उतरणार!



**जालना, ता. १३ :** सरकारने मराठा आंदोलकांवरील सरसकट गुन्हे मागे घेण्याचा शब्द दिलेला आहे. त्यामुळे सरसकटच गुन्हे मागे घ्यावे लागतील. मराठ्यांसाठी मी खंबीर असून, गुन्हे कसे मागे घेतले जात नाही ते मी बघतोच, असा इशारा मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना दिला आहे.

जरांगे पाटील यांनी आज अंतरवाली सराटी येथे पत्रकारांशी संवाद साधला. ते म्हणाले की, मी सरकार विरोधात सतत आंदोलने करून ८५० पेक्षा जास्त गुन्हे मागे घ्यायला लावलेत. फडणवीस जरी शब्दापासून बदलले असले तरी मी बदलणार नाही. राहिलेल्या गुह्यांबाबत विभागीय समितीचा अहवाल सरकारकडे जाणे गरजेचे आहे. मी आरक्षण तर घेणारच. पण राहिलेले गुन्हेही मागे घ्यायला लावणार, असेही जरांगे म्हणाले.

यावेळी त्यांनी मंत्री राधाकृष्ण विखे यांचाही समाचार घेतला. तुमची मस्ती जिरवण्यासाठी आरक्षण उपसमिती नाही. मराठेच मराठ्यांच्या अंगावर घालणे हे आरक्षण उपसमितीचे काम नाही. कोणते खटले न्यायालयात प्रलंबित आहेत त्यावर तोडगा काढणे आरक्षण उपसमिती अध्यक्षांचे काम, हे त्यांना कळत नाही का? असा सवालही जरांगे पाटील यांनी विखे यांना केला.




# पाठ्यपुस्तकातील मराठा साम्राज्याचा नकाशा हटवणे ही मराठ्यांच्या बलिदानाची प्रतारणा

## संभाजीराजेंचे शिक्षण मंत्री यांचे शिक्षणमंत्र्यांना पत्र

**कोल्हापूर, ता. १३ :** राष्ट्रीय शैक्षणिक संशोधन आणि प्रशिक्षण परिषदेने आठवीच्या पुस्तकातून मराठा साम्राज्याचा विस्तार दर्शविणारा नकाशा काढून टाकले आहे. त्यावरून संभाजीराजे छत्रपती यांनी केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांना याबाबत पत्र लिहले आहे. या पत्राची प्रत त्यांनी सोशल मीडियावर देखील शेअर केली आहे. त्यासोबत त्यांनी पाठ्यपुस्तकातील मराठा साम्राज्याचा नकाशा हटवणे ही मराठ्यांच्या बलिदानाची प्रतारणा आहे, असे म्हटले आहे.

ने पाठ्यपुस्तकातील मराठा साम्राज्याचा नकाशा कोणतेही ठोस कारण न देता वगळला आहे. ही मराठ्यांच्या उज्ज्वल इतिहासाची व राष्ट्र रक्षणासाठी त्यांनी दिलेल्या बलिदानाची प्रतारणा आहे. मराठ्यांचे प्रभुत्व संपूर्ण देशावर होते, याबाबतच्या समकालीन पुराव्यांसह इतिहासकरांनी भाष्य केलेले आहे.

मराठा साम्राज्याचा इतिहास व राष्ट्राच्या जडणघडणी मध्ये त्यांचे असलेले योगदान भावी पिढीस ज्ञात व्हावे, याकरिता मराठा साम्राज्याचा नकाशा पुनःश्च पाठ्यपुस्तकात समाविष्ट करावा, या मागणीचे सविस्तर पत्र केंद्रीय शिक्षण मंत्री यांस पाठविले आहे, असे संभाजीराजेंनी ट्विट केले आहे.

# विरोधी पक्षाचे आमदार, खासदार निवडूनच आले नाही पाहिजे

## अशा प्रकारे भाजपला मतदारसंघ फोडायचे आहेत : संजय राऊत

**मुंबई, ता. १३ :** भाजपला ज्या प्रकारे मतदारसंघांची पुनर्रचना करायची आहे ते लोकशाहीसाठी अत्यंत धोकादायक आहे, विरोधी पक्षाचे आमदार खासदार निवडूनच येऊ नयेत अशा प्रकारे त्यांना पुनर्रचना करायची आहे, असा घणाघात शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे नेते, खासदार संजय राऊत यांनी केला आहे. मुंबईतील पत्रकार परिषदेत त्यांना याबाबत प्रश्न विचारला असता त्यांनी भाजपवर जोरदार टीका केली.



१५ तारखेला विरोधी पक्षांची या संदर्भात बैठक होणार आहे. त्या बैठकीत चर्चा होईल. त्याआधी आम्ही शिवसेना पक्षप्रमुखांशी चर्चा करू. भाजपचं प्रत्येक पाऊल हे त्यांच्या व्यक्तीगत स्वार्थाचं असतं. राजकीय दृष्ट्या ते प्रगल्भ नसतं. लोकशाहीच्या, देशाच्या फायद्याचं नसतं. आमचा फायदा कुठेय हे पाहून त्यांची धोरणं ठरत असतात. मतदारसंघाची पुनर्रचना ज्या प्रकारे करण्याचं भाजपच्या मनात आहे ते लोकशाहीसाठी अत्यंत धोकादायक आहे. त्यांना अशाप्रकारे मतदारसंघ फोडायचे आहेत की विरोधी पक्षाचे आमदार खासदार निवडूनच येऊ नयेत.

निवडणूक आयोग हा भाजपच्या ताटाखालचं मांजर झालाय. त्याच्या मदतीने भाजप अंदाधुंद पद्धतीने मतदारसंघ तोडणार फोडणार. विरोधी पक्ष राहताच कामा नये किंवा आम्ही सांगू तेच राहतील असे त्यांचे मतदारसंघाचे डॉक्युमेंट्स तयार झाले आहेत. पण आम्ही ते होऊ देणार नाही. या संदर्भात सर्वपक्षीय चर्चा झाली पाहिजे, समिती नेमली गेली पाहिजे. भाजप व त्याच्या मित्रपक्षांच्या सोयीसाठी मतदारसंघ फुटले जाणार नाहीत. माझे मतदारसंघ माझ्या माझ्या पद्धतीने तयार करून घेईल असे होणार नाही, असे संजय राऊत यांनी ठणकावून सांगितले. महिला आरक्षणावरून जे राजकारण सुरू आहे ते एकतर्फी आहे. मोदीजींना वाटतेय की महिला आरक्षणाचे ते मसीहा आहेत. तर तसं नाहीये. सर्वात आधी महाराष्ट्रात शरद पवार यांनी महिला आरक्षण सुरू केले, असेही संजय राऊत यांनी सांगितले.

# किकवी-केंजळ रस्त्यावर अज्ञात व्यक्तीचा संशयास्पद मृतदेह आढळला

**पुणे, ता. १३ :** पुणे जिल्ह्यातील भोर तालुक्यात रविवारी सकाळी एक धक्कादायक प्रकार समोर आला. किकवी-केंजळ रस्त्याच्या कडेला सुमारे ४० वर्षीय अज्ञात व्यक्तीचा मृतदेह संशयास्पद अवस्थेत आढळून आल्याने परिसरात भीतीचे वातावरण पसरले आहे. रविवारी सकाळी नेहमीप्रमाणे नागरिक कामासाठी बाहेर पडले असताना, रस्त्याच्या कडेला एक व्यक्ती निश्चल अवस्थेत पडलेली दिसली. नागरिकांनी जवळ जाऊन पाहिले असता त्या व्यक्तीचा मृत्यू झाल्याचे लक्षात आले. या घटनेची माहिती तत्काळ राजगड पोलीस ठाणे येथे देण्यात आली.



या घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत मृतदेहाचा पंचनामा केला. मात्र, मृत व्यक्तीची ओळख अद्याप पटलेली नाही. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, मृत व्यक्तीचे वय अंदाजे ४० वर्षे असून त्याने निळ्या रंगाचे जर्किन, निळी जीन्स आणि पांढरा टी-शर्ट परिधान केला होता. मृतदेह उत्तरीय तपासणीसाठी भोर येथील उपजिल्हा रुग्णालयात पाठवण्यात आला आहे. सध्या या प्रकरणी अकस्मात मृत्यू अशी नोंद करण्यात आली आहे.

दरम्यान, हा मृत्यू नैसर्गिक आहे की घातपाताचा प्रकार आहे, याचा तपास पोलीस करत आहेत. मृत व्यक्तीची ओळख पटवण्यासाठी परिसरातील बेपत्ता व्यक्तींच्या तक्रारींची पडताळणी केली जात असून सीसीटीव्ही फुटेज आणि तांत्रिक पुराव्यांच्या आधारेही तपास सुरू आहे. या घटनेमुळे किकवी परिसरात खळबळ उडाली असून, नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

# चारचाकीने दिलेल्या धडक दुचाकीवरील तरुण गंभीर जखमी

**लोणी काळभोर, ता. १३ :** पुणे-सोलापूर महामार्गावर स्कॉर्पिओ चालकाने दुचाकीस्वाराला धडक देऊन घटनास्थळावरून पलायन केल्याची घटना घडली आहे. ही घटना लोणी काळभोर (ता. हवेली) ग्रामपंचायत हद्दीतील बोरकर वस्ती परिसरात घडली आहे. या अपघातात तरुण गंभीर जखमी झाला आहे. तर लोणी काळभोर पोलिस ठाण्यात अज्ञात चालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

शुभम नानासो शितोळे (वय २९, रा. वंजारवाडी वस्ती, देलवडी, ता. दौंड) असे जखमी झेलल्याचे नाव आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी शुभम शितोळे हे हिंजवडी येथील खासगी कंपनीत नोकरी करत असून २५ मार्च २०२६ रोजी सकाळी कामावर जाण्यासाठी होंडा युनिकॉर्न दुचाकीवरून निघाले होते. सकाळी साडेसात वाजता




लोणी काळभोरजवळील बोरकर वस्ती येथील शेल पेट्रोल पंपासमोर पोहोचले असता, पुढे असलेल्या महिंद्रा स्कॉर्पिओ (चक १४ चत ७८८८) चालकाने कोणताही इंडिकेटर न देता अचानक यू-टर्न घेण्यासाठी वाहन थांबवले.

या अचानक हालचालीमुळे शितोळे यांची दुचाकी स्कॉर्पिओच्या समोरील भागावर आदळली आणि ते दुचाकीसह रस्त्याच्या मधील डिव्हायडरवर जाऊन आपटले. अपघातानंतर संबंधित चालक घटनास्थळी न थांबता पळून गेला. या अपघातात शितोळे यांच्या डाव्या पायाला दोन ठिकाणी फ्रॅक्चर, उजव्या हाताच्या अंगठ्याला फ्रॅक्चर तसेच डोक्याला व हाताला दुखापत झाली.

दरम्यान, स्थानिक नागरिकांनी तत्काळ मदत करत शितोळे यांना खासगी रुग्णवाहिकेतून विश्वराज हॉस्पिटलमध्ये दाखल केले. तेथे त्यांच्यावर आयसीयूमध्ये उपचार करण्यात आले. ३० मार्च रोजी त्यांना रुग्णालयातून डिस्चार्ज देण्यात आला. प्राथमिक उपचारांमुळे त्या वेळी पोलिसांना जबाब देणे शक्य झाले नव्हते. उपचारानंतर शितोळे यांनी स्वतः पोलीस ठाण्यात येऊन तक्रार दिली आहे. त्यानुसार अज्ञात स्कॉर्पिओ चालकाविरुद्ध गुन्हा दाखल केला असून, फरार चालकाचा शोध सुरू आहे.

# शिरूरमध्ये एमडी ड्रग्स विक्रीवर कारवाई; अल्पवयीन बालक ताब्यात

## सव्वा लाखांचा मुद्देमाल जप्त

**योगेश मारणे**

शिरूर, ता. १३ : शिरूर तालुक्यात अमली पदार्थांच्या वाढत्या विळख्यात आणखी एक धक्कादायक प्रकरण समोर आले असून, मेफेड्रोन (एमडी) या घातक ड्रग्सची विक्री करणाऱ्या एका अल्पवयीन बालकाला पोलिसांनी सापळा रचून ताब्यात घेतले आहे. स्थानिक गुन्हे शाखा पुणे ग्रामीण व शिरूर पोलीस स्टेशन यांनी संयुक्तरित्या ही कारवाई करत तब्बल १ लाख ३८ हजार ८०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

शनिवारी (ता. ११) संध्याकाळी ७ ते ८ वाजण्याच्या दरम्यान स्थानिक गुन्हे शाखेच्या



शिरूर उपविभागीय पथकाकडून गुन्हे नियंत्रण व अमली पदार्थ विरोधी मोहीम सुरू असताना, शिरूर बायपास परिसरातील बंद पडलेल्या नाना स्पॉट हॉटेलजवळ एक अल्पवयीन बालक मेफेड्रोन विक्रीसाठी येणार असल्याची गोपनीय माहिती पोलिसांना मिळाली.

माहितीची खातरजमा करून वरिष्ठांच्या सूचनेनुसार पोलिसांनी तत्काळ सापळा रचला.यावेळी संशयित बालकाला ताब्यात घेऊन त्याची झडती घेतली असता, त्याच्याकडून ६.९४ ग्रॅम वजनाचा मेफेड्रोन (एमडी) हा अमली पदार्थ जप्त करण्यात आला.या ड्रग्सची किंमत सुमारे १ लाख ३८ हजार ८०० रुपये असल्याचे पोलिसांनी सांगितले. या प्रकरणी शिरूर पोलीस ठाण्यात विविध कलमांच्या अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास स्थानिक गुन्हे शाखा व शिरूर पोलीस करीत आहेत.

ही कारवाई पोलीस अधीक्षक संदीप सिंह गिल्ल, अप्पर पोलीस अधीक्षक रमेश चोपडे, उपविभागीय पोलीस अधिकारी प्रशांत ढोले यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक प्रमोद क्षीरसागर तसेच शिरूर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक संदेश केंजळे यांच्या नेतृत्वाखाली पोलीस उपनिरीक्षक शुभम चव्हाण, पोलीस हवालदार तुषार पंदारे, जनार्दन शेळके, राजू मोमीन, संजू जाधव, अक्षय कळमकर व नीरज पिसाळ यांच्या पथकाने ही कारवाई केली.

दरम्यान,शिरूर तालुक्यात खुलेआम ड्रग्सची विक्री होत असल्याचे या घटनेवरून स्पष्ट होत असून, यामुळे नागरिकांमध्ये चिंता व्यक्त केली जात आहे. ड्रग्स माफियांची पाळेमुळे उखडून काढण्यासाठी पोलिसांनी आणखी कठोर व व्यापक कारवाई करावी,अशी जोरदार मागणी आता नागरिकांकडून होत आहे.